खनिज लिलाव नियम -२०१५ मधील नव्याने समाविष्ट नियम मायनिंग लिज संदर्भात १०-A व संयुक्त परवाना संदर्भात १८-A व त्यासोबतच्या अनुक्रमे अनुसूची VI व VII ची अंमलबजावणी करण्याकरीता महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन निर्णय क्र.एमएनजी-०४२६/प्र.क्र.४४/उद्योग-९अ**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १२ मे, २०२६.**

वाचा :-

१) Ministry of Mines Gazette Notification No. CG-DL-E-१७०२०२५-२६७००१ Dated १७.१०.२०२५.

२) महासंचालक, भू. व. ख. संचालनालय, नागपर यांचे पत्र क्र. MLV/Misc./४०८/Part- ३/२०२६/ १४३१, दिनांक २७.०४.२०२६.

**प्रस्तावना :-**

खाण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि. १७.१०.२०२५ च्या अधिसूचनेन्वये खनिज (लिलाव) द्वितीय सुधारणा नियम -२०२५ मध्ये नव्याने समाविष्ट नियम क्र. १०A (Mining Lease Block) व १८A (Composite Licence Block) व त्यासोबतची अनुक्रमे अनुसूची VI व VII या तरतूदी समाविष्ट केलेल्या असून त्यानुसार खनिजाचे समन्वयन करण्यासाठी खनिज प्रक्रिया मायनिंग लिज आणि संयुक्त परवाना विहीत कालावधीत कार्यान्वयीत होण्यासाठी काही मानके निश्चीत केलेले आहेत. अधिसूचनेनुसार खनिज (लिलाव) नियम-२०१५ मधील नियम मायनिंग लिज संदर्भात १० (ए) व संयुक्त परवाना संदर्भात १८ (ए) या तरतूदी नव्याने समावेश केलेल्या असून या सुधारणांद्वारे खाणकाम आराखडा (Mining Plan), पर्यावरणीय मान्यता (EC) आणि इतर आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी विशिष्ट कालमर्यादा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, अनूसुचीत (Schedules) नमूद केलेल्या टप्प्यांनुसार (Milestones) मानके या परवानग्या विहित वेळेत न मिळवल्यास दंडाची तरतूदही या नियमांमध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी महासंचालक भू. व ख. संचालनालय नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी समिती स्थापन करण्याबाबत महासंचालकानी पाठवलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :-**

खनिज (लिलाव) नियम सुधारीत २०२५ मध्ये नव्याने समाविष्ट तरतूद १०A (Mining Lease Block) आणि १८A (Composite Licence Block) व त्यासोबतच्या अनुक्रमे अनुसूची VI व VII ची अंमलबजावणी करण्यासाठी महासंचालक, भू. व ख. संचालनालय, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | महासंचालक, भू. व ख. संचालनालय, नागपूर | अध्यक्ष |
| २ | प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि नोडल अधिकारी (वन्यजीव) | सदस्य |
| ३ | अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि नोडल अधिकारी | सदस्य |
| ४ | प्रादेशिक खाण नियंत्रक, भारतीय खाण ब्युरो, नागपूर | सदस्य |
| ५ | संबधित जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी, महसूल विभाग | सदस्य |
| ६ | उपसचिव आणि शास्त्रज्ञ, पर्यावरण, वातावरणीय बदल विभाग | सदस्य |
| ७ | राज्य सरकारचे इतर संबधित विभाग (आमंत्रित) | सदस्य |
| ८ | संचालक, भू. व ख, संचालनालय, नागपूर | सदस्य सचिव |

२. खनिज (लिलाव) द्वितीय सुधारी नियम-२०२५ मधील नियम १०-ए आणि १८ ए मधील अनुसूची-VI व अनुसूची VII चमध्ये नमूद केलेल्या प्रत्येक टप्प्यासाठी (milestone) मानके व त्याच्या कालमर्यादेचे पालन करण्याची जबाबदारी समितीची असेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१२१८०६५८१५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LAXMIKANT GOPALRAO DHOKE

Digitally signed by LAXMIKANT GOPALRAO DHOKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELD, 2.5.4.20=413BEECA50B65438C7A037917CCF1F24D8CA684B65640DF6372EA731FFAC4DFC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E714BBCD4D43C6782884C7E7A2091F9F1EDC1D97EBB542C48B98FB8C8BDD6CF4, cn=LAXMIKANT GOPALRAO DHOKE
Date: 2026.05.12 18:09:46 +05'30'

(लक्ष्मीकांत ढोके)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
२. अप्पर मुख्य सचिव (खनिकर्म), मंत्रालय, मुंबई-३२.
३. अप्पर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई-३२.
४. अप्प अप्पर मुख्य सचिव (वने), मंत्रालय, मुंबई-३२.
५. सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) मंत्रालय, मुंबई-३२.
६. संबधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी.
७. सह सचिव (खनिकर्म) ,उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. उपसचिव आणि शास्त्रज्ञ, पर्यावरण, वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय
९. संबधित जिल्ह्यांचे उपजिल्हाधिकारी.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि नोडल अधिकारी
११. प्रादेशिक खाण नियंत्रक, भारतीय खाण ब्युरो, नागपूर
१२. संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय ,नागपूर-१०.
१३. सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग.
१४. निवडनस्ती (उद्योग-९अ)